MHSO130010062022

निशाणी क्र. १४ वर आदेश

प्रतिवादींनी त्यांना लेखी कैफीयत व म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्याची विनंती केली. त्यांचे असे म्हणणे आहे की सदर प्रकरणातील काही महत्वाची कागदपत्रे व माहिती मुदतीत उपलब्ध न झाल्याने तांत्रीक अडचणीमुळे विहीत मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला ४ महिने २४ दिवसाचा विलंब माफ होवुन प्रतिवादीची कैफियत व म्हणणे स्वीकारण्यात यावे म्हणुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. वादीने सदर अर्जावर म्हणणे सादर करुन सदरच्या अर्जाला तीव्र हरकत घेतली. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्जामध्ये नमुद केलेली सर्व कारणे खोटी आहेत तसेच सदर अर्ज मोघम स्वरुपाचा असल्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०२. दोन्ही पक्षांना ऐकले. प्रतिवादी यांना वाद समन्स दिनांक १८/०१/२०२३ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर ते दाव्यात हजर झाले. परंतु त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला ४ महिने २४ दिवसाचा विलंब झालेला आहे. सदरचे प्रकरण निरंतर ताकिदीसाठी दाखल केले आहे. या प्रकरणात प्रतिवादीचे स्वारस्य आहे. सदर दाव्याच्या कामकाजाकरीता नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादीचे म्हणणे ऐकुन घेणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना दाव्यात हजर करुन त्यांची लेखी कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर घेतल्यास दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांची लेखी कैफीयत दाखल करुन त्यांना प्रकरण बचाव करण्याची संधी देणे गरजेचे आहे. म्हणुन सदरचा अर्ज रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) रुपयांच्या खर्चासह मंजुर करुन प्रतिवादीला लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. प्रतिवादीने सदरचा खर्च पुढील तारखेच्या आत वादीला दयावा. सदरचा खर्च वादीला दिल्यानंतरच त्यांची लेखी कैफीयत अभिलेखावर घेण्यात यावी.

Sd/-
(एस.बी. विजयकर)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), बार्शी.

बार्शी
दिनांकः ०२/०१/२०२४

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B.Vijaykar, Jt.C.J.J.D.&J.M.F.C. Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 02/01/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 03/01/2024 |